प्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम-
आदिवासी भागासाठी लोकवर्गणी

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :- ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ५ जानेवारी, २००४

वाचा :- (१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
(२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-२००१/प्रक्र-१९०/ पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१
(३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/पापु-०७, दिनांक २३ मार्च, २००२.
(४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक २२ ऑगस्ट, २००३
(५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१००३/प्रक्र-१६६/पापु-०७, दिनांक ८ ऑक्टोबर, २००३

प्रस्तावना :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाचे सुधारित धोरण संदर्भिय क्र.१ येथील दिनांक २७.७.२००० च्या शासन निर्णयान्वये संपूर्ण राज्यामध्ये लागू करण्यात आल्यानंतर या सुधारित धोरणातील लोकसहभागाचे तत्व स्पष्ट करुन त्याअनुषंगाने धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संदर्भिय क्र.२ येथील दिनांक ३.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यामध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने "जलस्वराज्य" प्रकल्प राबविण्यात येत असून, या "जलस्वराज्य" प्रकल्पांतर्गत आदिवासी क्षेत्रामध्ये हाती घेण्यात येणा-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची लोकवर्गणी ५% करण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत आदिवासी क्षेत्रामध्ये हाती घेण्यात येणा-या योजनांसाठीही लोकवर्गणी ५% करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत, तसेच शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत विविध स्त्रोतातून उपलब्ध होणा-या निधीमधून आदिवासी क्षेत्रामध्ये राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठीची **लोकवर्गणी किमान ५ %** करण्यास शासन मान्यता देत आहे. योजना घ्यावयाच्या गावात/वाडीत आदिवासींची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार गावाच्या/वाडीच्या एकूण लोकसंख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.

H-1012 (4000-1-04) C क्रु. आ. प.

२. राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमामधून सर्वसाधारण क्षेत्रात लोकसहभागाची १०% रक्कम तर, आदिवासी क्षेत्रात/गावात/वाडीत लोकसहभागाची ५% रक्कम पूर्णतः रोख स्वरुपात अथवा श्रमदान, वस्तुदान व अंशतः रोख स्वरुपात जमा करावयास मुभा आहे. लोक सहभागाचा हिस्सा अंशतः रोख स्वरुपात भरावयाचे असल्यास, सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ५% व आदिवासी क्षेत्र/गाव/ वाडीसाठी किमान १% रक्कम रोख स्वरुपात जमा करणे आवश्यक आहे. योजनेच्या प्रस्तावाला मंजूरी देताना सक्षम प्राधिका-यांने अशा प्रकारे जमा करावयाच्या किमान रोख रक्कमेपैकी जास्तीत जास्त लोकसहभागाची रक्कम (सर्वसाधारण क्षेत्रासाठी किमान ३% व आदिवासी क्षेत्र/गाव/वाडीसाठी १%) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता निधीच्या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सर्व)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
तहसिलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपुर (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता)
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
मंत्रालयातील सर्व इतर विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

* * * * *